VOL- XI ISSUE- II FEBRUARY 2024 PEER REVIEW e-JOURNAL IMPACT FACTOR 8.02 ISSN 2349-638x

# मुक्त विद्यापीठातील सेवांतर्गत बी. एड. करणाऱ्या प्रौढ शिक्षकांना भेडसावणाऱ्या समस्यांचा अभ्यास

**डॉ. सिद्धार्थ सुधाकरराव होवाळ**
सहयोगी प्राध्यापक,
महात्मा फुले एम.एड. महाविद्यालय, जळकोट

**गोषवारा:**

*प्रस्तुत अभ्यास मुक्त विद्यापीठाच्या वातावरणाच्या संदर्भात सेवांतर्गत बी.एड. करणाऱ्या प्रौढ शिक्षकांसमोरील आव्हानांचा शोध घेण्याचा प्रयत्न करतो. या आव्हानांचा तपास करून, अशा शिक्षकांच्या व्यावसायिक विकासावर परिणाम करणाऱ्या सूक्ष्म अडथळ्यांवर प्रकाश टाकणे हे उद्दिष्ट आहे. अध्यापनाचा कार्यभार, व्यावसायिक जबाबदारी आणि अध्यापनशास्त्रीय दृष्टीकोन यासारख्या घटकांचा सर्वसमावेशकपणे अभ्यास केला असून शिक्षक शिक्षणाची गुणवत्ता वाढविण्यासाठी धोरणे सूचित करण्याचा प्रयत्न करतो.*

**प्रस्तावना:**

मुक्त विद्यापीठांच्या चौकटीत शिक्षक शिक्षणाची प्रक्रिया प्रौढ शिक्षकांना आकार देण्यात महत्त्वाची भूमिका बजावतो. विविध विद्यार्थ्यांची उपलब्धता, पारंपरिक शिक्षण पद्धतीमुळे समस्या निर्माण होत आहेत. तथापि, मुक्त विद्यापीठ शिक्षणामध्ये सेवांतर्गत बी.एड. करताना प्रौढ शिक्षकांना असंख्य आव्हानांचा सामना करावा लागतो ज्याकडे लक्ष देण्याची आणि निराकरणाची आवश्यकता असते. सेवांतर्गत बी.एड. करताना प्रौढ शिक्षकांना बऱ्याचदा कामाचा ताण सहन करावा लागतो, प्रशासकीय कामांसह अध्यापनाच्या जबाबदाऱ्या पार पाडणे आणि अभ्यासक्रम पूर्ण करणे या आव्हानांचा सामना करावा लागतो. पारंपारिक अध्यापन प्रणाली व मुक्त विद्यापीठांमधील सेवेतील बी.एड. प्रणाली अंतर्गत प्रौढ शिक्षकांचा व्यावसायिक विकास यामध्ये फरक आहे. पारंपारिक पद्धती आणि शिक्षकांचे मनोबल आणि कार्यक्षमतेत अडथळा आणू शकते, ज्यामुळे भविष्यात विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक संपादणूक संबंधी अपेक्षित परिणाम दिसून येत नाही. मुक्त विद्यापीठात शैक्षणिक विविधता आढळून येते. सेवांतर्गत बीएड प्रौढ शिक्षकांनी या विविधतेला सामावून घेण्यासाठी त्यांच्या शिकवण्याच्या धोरणांमध्ये कुशलतेने जुळवून घेणे आवश्यक आहे. मुक्त विद्यापीठाच्या तंत्रज्ञानाचा वापर हा सेवांतर्गत बीएड करणाऱ्या प्रौढ शिक्षकांसाठी संधी आणि आव्हाने दोन्ही निर्माण करतो. डिजिटल साधनाची सुलभता येण्यासाठी शिक्षकांना तांत्रिक साक्षरता सारख्या समस्यांशी संबंधित अडथळे येऊ शकतात. मुक्त शिक्षण, स्वयं-निर्देशित शिक्षण, सहयोगी शिक्षण आणि क्षमता-आधारित मूल्यमापन यासारख्या नाविन्यपूर्ण अध्यापनशास्त्रीय दृष्टिकोनांसह प्रयोगांना प्रोत्साहन दिले पाहिजे. सेवांतर्गत बी.एड. करणाऱ्या प्रौढ शिक्षकांना या पद्धती प्रभावीपणे अंमलात आणण्यासाठी प्रशिक्षण आवश्यक आहे.

**उद्दिष्टे :**

1. मुक्त विद्यापीठातील सेवांतर्गत बी. एड. करणाऱ्या प्रौढ शिक्षकांना येणाऱ्या समस्यांच्या सद्यस्थितीचा अभ्यास करणे.
2. सेवांतर्गत बी. एड. करणाऱ्या प्रौढ शिक्षकांना येणाऱ्या समस्या सोडविण्यासाठी उपाययोजना सुचविणे.

**संशोधनाची गरज :**

अ) मुक्त विद्यापीठातील सेवांतर्गत बी. एड. करणाऱ्या प्रौढ शिक्षकांना येणाऱ्या समस्यांच्या सद्यस्थितीची माहिती मिळेल.

आ) मुक्त विद्यापीठातील सेवांतर्गत बी. एड. करणाऱ्या प्रौढ शिक्षकांना अधिकाधिक सक्षम करण्यासाठी माहिती देता येईल.

इ) सेवांतर्गत बी. एड. करणाऱ्या प्रौढ शिक्षकांच्या अध्यापन कौशल्यात वाढ होणे आवश्यक आहे.

**संशोधनाचे महत्व :**

अ) या संशोधनामुळे मुक्त विद्यापीठातील सेवांतर्गत बी. एड. करणाऱ्या प्रौढ शिक्षकांना त्यांच्या समस्यांचे ज्ञान मिळेल.

आ) सेवांतर्गत बी. एड. करणाऱ्या प्रौढ शिक्षकांना येणाऱ्या समस्या सोडविता येतील.

इ) सेवांतर्गत शिक्षक शिक्षणाची गुणवत्ता वाढविता येईल.

**संशोधन व्याप्ती व मर्यादा :**

1. प्रस्तुत संशोधन कार्यासाठी मुक्त विद्यापीठातील सेवांतर्गत बी. एड. करणाऱ्या प्रौढ शिक्षकांचाच विचार करण्यात आलेला आहे.
2. प्रस्तुत संशोधन कार्यासाठी मुक्त विद्यापीठातील सेवांतर्गत बी. एड. करणाऱ्या प्रौढ शिक्षकांना येणाऱ्या समस्यांचाच विचार केलेला आहे.
3. सदर संशोधन कार्य केवळ शैक्षणिक वर्ष 2022-2023 या कालावधीपुरते मर्यादित आहे. त्याचबरोबर प्रस्तुत संशोधनाचे निष्कर्ष हे प्रतिसादकांनी दिलेल्या प्रतिसादावर अवलंबून आहेत.

**परिमर्यादा :** सदर संशोधन हे पुढील घटकांसाठी परीमर्यादित आहे.

अ. प्रस्तुत संशोधनाचे निष्कर्ष हे महाराष्ट्र राज्यातील अहमदपूर तालुक्यातील मुक्त विद्यापीठातील सेवांतर्गत बी. एड. करणाऱ्या प्रौढ शिक्षकांपुरतेच मर्यादित आहेत.

ब. प्रस्तुत संशोधनात मुक्त विद्यापीठातील सेवांतर्गत बी. एड. करणाऱ्या प्रौढ शिक्षकांना येणाऱ्या समस्यांचाच अभ्यास अपेक्षित आहे.

**संशोधन पद्धती व माहिती संकलनाची साधन:**

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड अंतर्गत शिक्षणशास्त्र महाविद्यालयात यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापिठाच्या द्वारे सेवांतर्गत करणाऱ्या शिक्षकांना समस्या जाणवतात त्यांची सद्यस्थिती पाहण्याच्या हेतुनुसार वर्णनात्मक संशोधन पद्धतीमधील सर्वेक्षण पद्धतीचा वापर केलेला आहे. जास्त प्रमाणात वापरली जाणारी सर्वेक्षण पद्धती असली तरी माहिती गोळा करण्यासाठी योग्य साधनाचा वापर केला तर योग्य माहिती मिळते. त्यामुळे प्रश्नावलीची रचना केली असून या प्रश्नावलीमधील प्रश्न हे मिश्र स्वरूपाचे आहेत. विश्वसनियता व सप्रमाणता तपासून, भेदाभेदन क्षमता व काठीण्य मूल्य काढून प्रश्नावली वितरीत करून माहिती संकलित केली आहे.

**न्यादर्श :** प्रस्तुत संशोधनासाठी जनसंख्या हाच न्यादर्श म्हणून निवडला आहे.

**संख्याकिय तंत्र :** उपरोक्त वर्णन केलेल्या प्रश्नावलीचा वापर करून संकलित केलेली माहितीला अर्थ लावण्यासाठी शेकडेवारी वापरून विश्लेषण करून अर्थनिर्वचन केले आहे.

**प्राप्त माहितीचे विश्लेषण दर्शविणारा तक्ता:**

| अ.क्र. | प्रश्न विवरण | प्रश्न क्र. | पर्याय 1 | पर्याय 2 | पर्याय 3 | पर्याय 4 |
|---|---|---|---|---|---|---|
| 1. | प्रौढ शिक्षकांना मिळणारा उपलब्ध वेळ विषयक प्रतिसाद | 3 | 49 | 14 | 14 | 13 |
| 2. | प्रौढ शिक्षकांची शालेय कामकाजाबाबत चा प्रतिसाद | 5 | 11 | 46 | 10 | 23 |
| 3. | प्रौढ शिक्षकांचे शालेय दैनंदिनी व कुटुंब विषयक प्रतिसाद | 8 | 14 | 20 | 45 | 11 |
| 4. | प्रौढ शिक्षकांच्या शैक्षणिक वृद्धी बाबतचा प्रतिसाद | 13 | 69 | 03 | 10 | 08 |
| 5. | प्रौढ शिक्षकांना बी.एड. करण्यासाठी मिळणारा वेळ बाबत प्रतिसाद | 17 | 10 | 07 | 03 | 60 |
| 6. | प्रौढ शिक्षकांना अभ्यासकेंद्रातून मिळणारे मार्गदर्शनविषय | 19 | 10 | 12 | 45 | 23 |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | क प्रतिसाद | | | | | |
| 7. | प्रौढ शिक्षकांची शाळा व अभ्यासकेंद्र यातील अंतराचा प्रतिसाद | 23 | 13 | 64 | 07 | 06 |

**विश्लेषण :**

1. प्रौढ शिक्षकांना मिळणारा अपुरा वेळ विषयक 54% प्रतिसाद मिळाला.
2. प्रौढ शिक्षकांची शालेय कामकाजातून होणारी धावपळ बाबत 51 % प्रतिसाद प्राप्त झाला.
3. प्रौढ शिक्षकांचे शालेय दैनंदिनी मुळे कुटुंबाकडे होणारे दुर्लक्ष बाबत 50% प्रतिसाद
4. प्रौढ शिक्षकांच्या शैक्षणिक वृद्धी बाबत 76% प्रतिसाद मिळाला.
5. प्रौढ शिक्षकांना बी.एड. करण्यासाठी मिळणारा वेळ बाबत 66% प्रतिसाद प्राप्त झाला.
6. प्रौढ शिक्षकांना अभ्यासकेंद्रातून मिळणारे अपुरे मार्गदर्शन विषयक 71 % प्रतिसाद मिळाला.

**अर्थनिर्वचन :**

1. निम्म्याहून अधिक प्रौढ शिक्षकांना अपुरा वेळ मिळतो.
2. निम्म्या प्रौढ शिक्षकांची शालेय कामकाजाबाबत धावपळ होते.
3. निम्म्या प्रौढ शिक्षकांना शालेय दैनंदिनी मुळे कुटुंबाकडे होणारे दुर्लक्ष दिसून आले.
4. बहुसंख्य प्रौढ शिक्षकांना शैक्षणिक वृद्धी होते.
5. निम्म्याहून अधिक प्रौढ शिक्षकांना बी.एड. करण्यासाठी अपुरा वेळ मिळतो.
6. बहुसंख्य प्रौढ शिक्षकांच्यामते अभ्यासकेंद्रातून अपुरे मार्गदर्शन मिळते.

| **प्रतिसादाचा अर्थ** | **अल्प** | **साधारण** | **निम्मा** | **निम्म्याहून अधिक** | **बहुसंख्य** | **जवळपास सर्व** |
|---|---|---|---|---|---|---|
| **प्राप्त प्रतिसाद** | 0 ते 16 | 17 ते 45 | 46 ते 52 | 53 ते 69 | 70 ते 85 | 86 ते 100 |

प्राप्त प्रतिसादाचे अर्थनिर्वचन करण्यासाठी वरील तक्त्याचा वापर केला आहे.

**निष्कर्ष:**

1. प्रौढ शिक्षकांना अपुरा वेळ मिळतो.
2. प्रौढ शिक्षकांची शालेय कामकाजात धावपळ होते.
3. प्रौढ शिक्षकांना शालेय दैनंदिन कामामुळे कुटुंब व इतर कामांकडे दुर्लक्ष होते.
4. प्रौढ शिक्षकांना ज्ञानात वाढ होते.
5. प्रौढ शिक्षकांना दैनंदिन वेळेच्या संदर्भात समस्या जाणवतात.
6. प्रभावी मार्गदर्शनाचा अभाव दिसतो.
7. अभ्यासकेंद्र आणि शिक्षकांची शाळा यामधील अंतर जास्त असते.

**शिफारशी :**

1. प्रौढ शिक्षकांसाठी सुनियोजित उजळणी वर्ग असावा.
2. सेवांतर्गत बी.एड. साठी ऑनलाईन प्रशिक्षणाची सोय असावी.
3. विद्यार्थी प्रगतीवरून शिक्षकांची बढतीसाठी नियमावली तयार करावी.
4. शिक्षकांच्या नाविन्य उपक्रमाचा अहवालास प्राधान्य दिले पाहिजे.
5. प्रशिक्षण संस्था व शिक्षकांच्या शाळा यामधील अंतर कमी करण्याचा प्रयत्न करावा.

**सारांश:**

मुक्त विद्यापीठाच्या प्रणाली मध्ये सेवांतर्गत बी.एड. करणाऱ्या प्रौढ शिक्षकांसमोरील आव्हाने बहुआयामी आहेत. सर्वसमावेशक अध्यापन पद्धतींना चालना देणे आणि तांत्रिक एकात्मता सुलभ करणे हे शिक्षकांच्या ज्ञानवाढीसाठी अनुकूल वातावरण तयार करू शकतात. अशा माध्यमातून मुक्त विद्यापीठांमधील शिक्षकांच्या शिक्षणाची गुणवत्ता वाढवली जाऊ शकते.

**संदर्भ :**

1. Ketan Sherry Chand, Vijaya Kuril, Samvet Satish Deshmukh ,(2023)Teacher Development in India , Taylor & Francis Books India Pvt.
2. S. Giridhar,(2022), ORDINARY PEOPLE EXTRAORDINARY TEACHERS: The

VOL- XI | ISSUE- II | FEBRUARY | 2024 | PEER REVIEW e-JOURNAL | IMPACT FACTOR 8.02 | ISSN 2349-638x

Heroes of Real India, Westland Books A Division of Nasadiya Technologies Pvt ltd

3. गीता पुष्प शॉ एवं जायस पुष्प शॉ "प्रसार शिक्षा" प्रकाशक : विनोद पुस्तक मन्दिर-आगरा-2, 2007।
4. भिंताडे, वि. रा. (१९९९), शैक्षणिक संशोधन पद्धती, पुणे, नूतन प्रकाशन.
5. मुळे, उमाटे (१९८७), शैक्षणिक संशोधनाची मूलतत्वे, नागपूर, महाराष्ट्र विद्यापीठ, ग्रंथनिर्मिती मंडळ.

Aayushi International Interdisciplinary Research Journal
ISSN 2349-638X
www aiirjournal.com